वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम ६६

२) महाराष्ट्र शासन शिक्षण सेवायोजन विभाग निर्णयक्र पीईएन -१०७८/११०५/२०६५/ माशि-०६ दि.०९/०९/१९८८

३) मा.आयुक्त,यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५

४) मा.आयुक्त सो.यांचेकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/५४६/२०१६ दि ७/१०/२०१६

५) श्रीम.शेख सहेलिना सादिक,सहा.शिक्षिका यांचा दि.१८/०९/२०२४ चा अर्ज.

६) मा.लेखाधिकारी यांचेकडील दि.२६/०९/२०२४ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत दाखला.

७) मुख्याध्यापक ,मा.वि. पिंपळे गुरव यांच्याकडील दि.१६/१०/२०२४ चे पत्र.

८) दि.२९/११/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/८९०/२०२४
दि.२९/११/२०२४

विषय – श्रीम.शेख सहेलिना सादिक "सहाय्यक शिक्षिका" स्वेच्छानिवृत्तीबाबत संगणक क्र.८८९२

आदेश,

श्रीम.शेख सहेलिना सादिक ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "सहाय्यक शिक्षक" या पदावर माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत माध्यमिक विद्यालय पिंपळे गुरव या विद्यालयामध्ये कार्यरत आहेत.त्यांनी दि. १८/०९/२०२४ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छानिवृत्ती देणेबाबत विनंती केली आहे.

श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक" म.न.पा.मध्ये दि.२०/१०/२००१ रोजी शिक्षणसेवक या अभिनामाच्या पदावर रूजू झाल्या आहेत.त्यांची सेवानोंद पुस्तकातील नोंदीनूसार जन्मतारीख १९/१०/१९७१ अशी आहे. श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक" यांच्या सेवानोंद पुस्तकाची तपासणी केली असता त्यांना सेवासातत्य देणेत आलेले नाही,असे दिसून येत आहे. त्यांची स्वेच्छानिवृत्तीच्या तारखेपर्यंत म्हणजेच दि.१७/१२/२०२४ अखेर त्यांची मनपामध्ये एकूण २३ वर्ष,०१ महिना व २८ दिवस सेवा पूर्ण होत असुन त्यांची ०४ वर्ष १० महिने १३ दिवस सेवा शिल्लक आहे. श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक" यांची सेवा कालावधीमध्ये एकूण ३०९ दिवस विनावेतनी झालेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ मध्ये शासकीय कर्मचा-याची २० वर्ष इतकी अर्हताकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिका-यांस ०३ महिन्याची लेखी नोटीस देउन सेवेतुन केव्हाही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतुद आहे.त्यानुसार त्यांनी ०३ महिने अगोदर वाचले क्र.०५ अन्वये कळविलेले आहे.

श्रीम.शेख सहेलिना सादिक,सहाय्यक शिक्षिका यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्रीम.शेख सहेलिना सादिक,सहाय्यक शिक्षिका यांच्याकडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज,संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम यांचेकडील कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेतघरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.६ अन्वये लेखाधिकारी,लेखा विभाग यांनी अभिप्राय दिलेला आहे.तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचे कडील दि.२३/०९/२०२४ रोजीचा थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केलेला आहे.तसेच भविष्यात लेखापरीक्षण आक्षेप निघाल्यास संबंधितांकडून वसुल करणेत येईल.संदर्भिय वाचले क्र.०७ अन्वये मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळे गुरव यांनी श्रीम.शेख सहेलिना सादिक,सहाय्यक शिक्षिका यांना स्वेच्धानिवृत्ती देणेबाबत स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब,मी सहाय्यक आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगपालिका पिंपरी ४११०१८. उपरोक्त वाचले क्र.०१ व ०२ मधील महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियमातील उक्त तरतूद व शासन निर्णय अन्वये श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक" यांना १७/१२/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर महापालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्ती देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक" यांच्या सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्रीम.शेख सहेलिना सादिक,"सहाय्यक शिक्षक"
माध्यमिक विद्यालय पिंपळे गुरव
प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपळे गुरव
२/- पुढील कार्यवाहीसाठी